# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 926 /शि.वि./2017
दि. 29/04/2017

**स्मरणपत्र –2**

**प्रति,**

1) मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका, सर्व प्राथ./उच्च प्राथ.शाळा
2) सर्व देयक लिपीक,(प्राथमिक),झोन क्र. 1 ते 10,
म.न.पा.,नागपूर

**विषय :– प्राथमिक शिक्षण विभागातील ज्या शिक्षकांना नियमानुसार एकाच पदावर 24 वर्षे पूर्ण झालेले आहे त्यांची निवडश्रेणी मिळण्याबाबत नियमानुसार प्रस्ताव आस्थापना विभागास सादर करण्याबाबत.**

**संदर्भ :–** 1) मा.सहा.आयुक्त,सा.प्र.वि.नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. 77/आस्थापना दि.27.7.2017
2)मा.सहा.आयुक्त,सा.प्र.वि.नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. 77/आस्थापना दि.30.06.2017
3)मा.सहा.आयुक्त,सा.प्र.वि.नागपूर महानगरपालिका नागपूर यांचे पत्र क्र. 481/आस्थापना दि.18.03.2017

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, प्राथमिक शिक्षण विभागातील सहा.शिक्षक ज्यांना एकाच पदावर 24 वर्षे पूर्ण झाले आहेत. अश्या शिक्षकांनी निवड श्रेणी करीता विहीत शैक्षणिक अर्हता प्राप्त केली आहे. तसेच शासन विहीत करेल असे सेवा अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले असेल, अशा शिक्षकांचे निवड श्रेणी देय दिनांक अगोदरचे 5 वर्षाचे गोपनीय अहवाल, मूळ सेवापुस्तक तसेच त्यांचेवर कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी आहे की नाही याबाबतचे आहे किंवा नाही याबाबतचे माहितीसह नियमानुसार प्रस्ताव सर्व देयक लिपीकांमार्फत नियम व निकषानुसार आस्थापना विभाग येथे पाठविण्याचे निर्देश दिले आहे.

सदर प्रस्ताव एकत्रितपणे तीन दिवसाचे आंत आस्थापना विभागाकडे सादर करावयाचे असून शासन नियमानुसार निवडश्रेणी देण्याबाबत प्रकरण विभागीय पदोन्नती समिती समक्ष निर्णयार्थ ठेवण्यात येणार आहे. त्यामुळे शिक्षण विभाग प्राथमिक आस्थापनेतील शिक्षकांचे प्रस्ताव संपूर्ण निकष तपासून सादर करणे आवश्यक आहे.

एकाच पदावर 24 वर्षे पूर्ण झालेल्या प्राथमिक शिक्षकाला त्रीस्तरीय निवडश्रेणी देण्यास्तव खालील निकषाची पूर्तता करणे आवश्यक आहे.

1) एकाच पदावर 24 वर्षे पूर्ण अखंडीत सेवा झालेली असावी.
2) सदर शिक्षकाने पदवी किंवा तत्सम शिक्षण धारण केलेले असावे.
3) शासनाने विहीत केलेले सेवा अंतर्गत प्रशिक्षण पूर्ण केले असावे.
4) मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल समाधानकारक असावे.
5) त्याचेवर कोणतीही विभागीय चौकशी प्रलंबित नसावी.

उपरोक्त निकषाची काटेकोरपणे तपासणी करून आवश्यक दस्तऐवज संलग्न करून नियमानुसार प्रस्ताव आस्थापना विभाग येथे सादर करण्याबाबत देयक लिपीक यांना सूचना देण्यात आल्या होत्या. परंतु आपण अद्याप प्रस्ताव सादर केले नसल्याचे संदर्भिय पत्राव्दारे कळविण्यात आले आहे. तरी आपल्या शाळेत/झोन अंतर्गत कार्यरत प्राथमिक शिक्षकांचे उपरोक्त निकष पूर्ण झालेले प्रस्ताव तीन दिवसाचे आंत तयार करून सेवापुस्तकासह झोनचे देयक लिपीक यांचेकडे सादर करावे.देयक लिपीक यांना झोन अंतर्गत सर्व प्रस्ताव एकत्रित करून दि.10.07.2017 पर्यंत आस्थापना विभाग येथे सादर करण्याच्या सूचना आपणांस दिल्या होत्या. परंतु अद्याप आपण असे प्रस्ताव सादर केले नसल्याचे संदर्भिय पत्र क्र.1 नुसार विभागास कळविण्यात आले आहे. तरी उपरोक्त प्रस्ताव दि.31.07.2017 पर्यंत आस्थापना विभागास सादर करावे. यानंतर कोणतेही प्रस्ताव स्विकारण्यात येणार नाही. तसेच पात्र शिक्षक या लाभापासून वंचित राहील्यास झोन स्तरावर शाळा निरीक्षक व देयक लिपीक यांचेवर तसेच शाळा स्तरावर संपुर्ण जबाबदारी आपणांवर निश्चित करण्यात येईल.

(संध्या मेडपल्लीवार)
**शिक्षणाधिकारी,**
**महानगरपालिका, नागपूर**

**प्रतिलिपी :–**

1) उपायुक्त–1, म.न.पा., नागपूर यांना माहितीस्तव